राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत लोकमंगल मल्टिस्टेट को.ऑप.सोसायटी,लि.जि.सोलापूर या संस्थेस १० मे.टन. क्षमतेचा दूग्ध भूकटी प्रकल्प व ५० हजार लि.वरुन १ लक्ष लि.दुग्धशाळेच्या विस्तारीकरणास प्रशासकीय मंजूरी व निधि वितरण...

महाराष्ट्र शासन
कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन शुध्दीपत्रक क्रमांकः राकृवि २०१६ /प्र.क्र.३२ /पदुम-८
मंत्रालय- विस्तार, मुंबई ४०० ०३२
तारीख: ०९ मार्च, २०१८

वाचा : कृषि व पदुम विभाग समक्रमांकित शासन निर्णय दि.१९ जानेवारी, २०१८.

शासन शुध्दीपत्रक :-

संदर्भाधीन शासन निर्णयातील अटी व शर्ती या शिर्षकाखालील परिच्छेद क्र.९ खालीलप्रमाणे सुधारीत केल्यानुसार वाचण्यात यावा.

“शासन निधी वितरीत होईल त्या प्रमाणात संघाने आपला हिस्सा गुंतविणे आवश्यक राहील. सदर प्रकल्प राबविणे सोयीचे व्हावे त्यासाठी संबंधित जिल्हयाचे जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी व संघाचे व्यवस्थापकीय संचालक यांचे संयुक्त खाते बँकेत उघडण्यात यावे. या संयुक्त खात्यामध्ये संघाच्या हिस्स्याची रक्कम ज्या प्रमाणात उपलब्ध होईल त्याच प्रमाणात या योजने अंतर्गत मंजूर असलेली तरतूद संबंधित प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिका-यांच्या मान्यतेनतर संघास अदा करण्यात येईल. सदर प्रकल्पाकरीता प्रादेशिक स्तरावर प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी हे “सनियंत्रण अधिकारी” राहतील.”

सदर शासन शुध्दीपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३०९११३१०४४२०१ असा आहे. हे शुध्दीपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rajesh Shaligram Govil
Digitally signed by Rajesh Shaligram Govil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Agriculture & ADF Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c549410b2251df8c92783a2da17afcacbe7f8fe3a4fd88f156fea84433871f11, cn=Rajesh Shaligram Govil
Date: 2018.03.09 11:31:11 +05'30'

(राजेश गोविल)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपाल,महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
२. मा. मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव
३. मा.मंत्री (पदुम)/ मा.राज्यमंत्री (पदुम)यांचे खाजगी सचिव
४. प्रधान सचिव (कृषि) यांचे स्वीय सहायक, कृषि व पदुम विभाग
५. आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, पुणे
६. आयुक्त दुग्धव्यवसाय विकास, महाराष्ट्र राज्य,
७. प्रादेशिक दुग्धव्यवसाय विकास अधिकारी,पुणे विभाग, पुणे
८. विभागीय उपनिबंधक सहकारी संस्था (दुग्ध) पुणे विभाग, पुणे
९. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, सांगली
१०. अध्यक्ष, लोकमंगल मल्टिस्टेट को.ऑप.सोसायटी,लि.जि.सोलापूर
११. निवडनस्ती.